म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १३८८

ज्ञानदेवांचें पसायदान

REFBK-0011493

अरविंद मंगरूळकर
विनायक मोरेश्वर केळकर

निबंध
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वमत.
अनुक्रम 32882 वि: निबंध
क्रमांक 93CC नों दि 93-3-82
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क. 99833
REFBK-0011493
REFBK-0011493

ज्ञानदेवांचें पसायदान

अरविंद मंगरूळकर
विनायक मोरेश्वर केळकर

प्रकाशक
एस्. आर. देशमुख
देशमुख प्रकाशन
७३९, बुधवार पेठ, पुणें २

मूल्य दीड रुपया

पहिली आवृत्ति, डिसेंबर १९६१

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५, सदाशिव पेठ, पुणें २



उपन्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

ज्ञानदेवांनी ‘ ज्ञानदेवी ’च्या अंतीं विश्वात्मक देवाजवळ आठ ओव्यांत (१७७२–१७७९) ‘ पसायदान ’ मागितलें आहे; आणि नवव्या ओवींत तें दिलें जाईल, ‘ (हा होईल दाओ पसाऊ ’–१८·१७८०.) असें ‘ विश्वेसरु राऊ ’ याने आश्वासन दिलें आहे. आपाततः या ओव्या सरळ आणि सुगम वाटतात; परंतु अन्वयार्थ, भाषा, व्याकरण यांच्या दृष्टीने त्यांचा सूक्ष्म विचार करूं लागलों, म्हणजे त्यांतील गुंतागुंत, अडचणी आणि बिकटपणा हीं उघड होतात. तीं दूर करण्याकरिता हा उपक्रम आम्ही करीत आहों.

कांही शाळांमधून प्रार्थनेच्या वेळीं विद्यार्थी प्रस्तुत ‘ पसायदान ’ म्हणतात. परंतु तें बहुतांशीं अशुद्ध म्हटलें जातें. आमच्या या उपक्रमाने छोट्या विद्यार्थ्यांना शुद्ध पाठाच्या ओव्या मिळणार आहेत; त्यांहून मोठ्या विद्यार्थ्यांना ओव्यांसमवेत अन्वय आणि अर्थ उपलब्ध होणार आहेत; आणि प्रगल्भ विद्यार्थी व सर्वसाधारण चिकित्सक वाचक यांना सविस्तर टीपांमध्ये त्यांचा अभिप्राय मिळेल.

‘पसायदानां’त ज्ञानदेवांनी कोणतीं दानें मागितलीं आहेत ? — (१) दुष्टांचा वाकडेपणा मोडावा; (२) त्यांचें सत्संगप्रेम वृद्धिंगत व्हावें; (३) प्राणिमात्रांचें परस्परांशीं जिव्हाळ्याचें सख्य व्हावें; (४) पातकाचें तिमिर लोपावें; (५) स्वधर्म-सूर्यानें विश्वाला प्रकाशित करावें; (६) प्राणिमात्राची इच्छापूर्ति व्हावी; (७) भूतमात्राला श्रद्धावंत ईश्वरनिष्ठांचे मेळावे भेटावे; (८) संतजन सर्वांना आप्तस्वकीय व्हावे; (९) त्रिभुवन सुखी व्हावें; (१०) त्रैलाक्याने आदिपुरुषाची भक्ति करावी; आणि (११) ग्रंथोपजीवी जन दृष्टादृष्ट विषयांत कृतार्थ व्हावे. या दानयाचनेवरून ज्ञानदेवांची आदर्श समाजाची कल्पना अभिव्यक्त होते. ही कल्पना किती भव्य, सार्वजनीन, सार्वकालिक व उदात्त आहे, हें पसायदानाने स्पष्ट होतें.

‘ थोर तत्त्वज्ञानी पुरुष आपल्या मताने आदर्श समाजाचें स्वरूप ठरवितात व त्या दिशेने समाजाची प्रगति व्हावी, असा प्रयत्न करितात. समाजवादी समाजरचना हें आजच्या काळाचें ध्येय आहे. गुरुदेव रानडे सांगतात, प्लेटोच्या दृष्टीने आदर्श समाज म्हणजे तेथे तत्त्वज्ञ राजा असावा किंवा राजा तत्त्वज्ञ असावा. कांटच्या मतें जेथे प्रत्येक व्यक्ति शुद्ध तर्काला धरून विचार करते व वागते आणि प्रत्येक व्यक्ति स्वतंत्र आहे, ती कशाचेंहि किंवा कोणाचेंहि साधन नाही, तो उत्कृष्ट समाज (Kingdom of Ends) होय. एकाच ध्येयाची जेथे प्रत्येक व्यक्तीला जाणीव आहे तो आदर्श समाज, असा ग्रीनचा थोर सिद्धांत आहे. सर्व धर्मांची व संतांची आदर्श समाजाची

कल्पना ईश्वराधिष्ठित आहे. "Kingdom of God" किंवा "Theopolis" हें त्यांचें ध्येय आहे. ईश्वराची भक्ति हें एकच ध्येय मानून भक्तींत मग्न झालेला, ईश्वराची आज्ञा शिरीं धरणारा व ईश्वराच्या प्रेमाने परस्परांबद्दल समभाव व बंधुभाव वाटणारा समाज त्यांना घडवावयाचा आहे. एक देव, एक धर्म, तरच एक मानवता, असें गुरुदेव म्हणत असत. विश्वबंधुत्व निर्माण करण्याला दुसरा मार्ग नाही. यापेक्षा उच्च सामाजिक ध्येय कल्पितां येईल का? असा समाज निर्माण कर, हें पसायदान ज्ञानेश्वरांनी देवाजवळ मागितलें आहे. साक्षात्कारी पुरुषाकडूनच अशा समाजाच्या निर्मितीला मदत होऊं शकेल. "आपण तरूनि विश्व तारा" किंवा "आधी केलें, मग सांगितलें" असे संतच समाजाला पूज्य वाटून समाज त्यांच्यामागे जाईल. म्हणून ज्ञानेश्वर देवाला विनवितात :

वर्षत सकळ मंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूतळीं। भेटोतु भूतां॥
किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुषीं। अखंडित॥

पसायदानाचें सार हेंच आहे.'[१]

'अनन्यभक्तांच्या उपदेशाने, उदाहरणाने, प्रेरणेने समाज ईश्वरोन्मुख झाला व आदिपुरुषाची भक्ति करूं लागला, म्हणजे पसायदानांत मागितलेले इतर सर्व वर आपोआप प्राप्त होतील, या विश्वासाने ज्ञानेश्वरांनी वरील दोन ओव्या लिहिल्या असाव्यात. आपणांला दुसरें काय मागावयाचें आहे! प्रातःकाली पूर्वाभिमुख झाल्यावर सर्वत्र आल्हाददायक तेज व प्रकाश दिसतात; त्याचप्रमाणे ईश्वरोन्मुख झाल्यावर अंतःकरणांत पावित्र्य व मांगल्य यांचा उदय होईल.'[२]

आदर्श समाजाविषयीच्या आपल्या कल्पना सांगण्याचा मानवी मनाचा छंद फार प्राचीन आहे. पाश्चात्त्य-पौरस्त्य विचारवंत, पंडित, कवि, तत्त्वज्ञ, समाजहितैषी राजकारणधुरीण, ज्ञानी अशा सर्वांनी आपापल्या परीने आदर्श समाजाची रचना कशी असावी, त्यांतले परस्परसंबंध कसे रहावे, वृत्ति कशा विकसित व्हाव्या, त्या कशा कार्यप्रवण बनाव्या, आणि ध्येयोन्मुख व्हाव्या, हें कधी विस्ताराने विवेचनपूर्वक सांगितलें आहे, तर कधी संक्षेपाने अध्याहारपूर्वक सूचित केलें आहे. निवेदकाच्या स्वतःच्या वृत्तीस अनुसरून अशा कल्पनांत कधी भौतिक गोष्टींच्या प्राप्तीवर भर असतो, कधी आध्यात्मिक सत्त्वसंपदेकडे रोख असतो, कधी अधिदैविक यशःप्राप्तीकडे कल असतो, कधी योग्य समाजधारणेचा अभिप्राय प्रभावी असतो, कधी शासनयंत्रणेचा निर्देश असतो, तर

१. संतांच्या सहवासांत : गणेश विष्णु तुळपुळे : पृ. १८१.
२. संतांच्या सहवासांत : गणेश विष्णु तुळपुळे : पृ. १८.

कधी यांतल्या अनेक गोष्टींचा संकलित विचार गर्भित असतो. यांतील कल्पनांचें श्रेष्ठ-कनिष्ठपण ठरविणें हें ज्याच्या-त्याच्या वृत्तीवर अवलंबून राहील; परंतु त्यांतील उद्‌बोधनाचें कार्य मात्र कोणालाच डावलितां येणार नाही. या संदर्भांत प्लेटो, कांट व ग्रीन यांचा निर्देश यापूर्वी येऊन गेलेलाच आहे. ऋग्वेदांतहि

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥[१]

ऋग्वेद, १०. १९१. ४.

असा व्यापक आशीर्वाद व्यक्त केला आहे.

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखभाग् भवेत् ॥ [२]

हेंहि वचन विख्यात आहे. या संबंधांत ज्ञानदेवांची परमावधीची करुणाशील, प्रशांत, अध्यात्मकल्याणपर, आस्तिक्ययुक्त, श्रद्धापूर्ण भाववृत्ति प्रस्तुत 'पसायदानां'त प्रतिपदीं प्रत्ययास येईल. श्रीसमर्थ रामदासांनीहि वेगवेगळ्या प्रसंगीं याविषयीचे आपले विचार प्रकट केले आहेत. त्यांचा यथावत् परिचय मुळांतूनच व्हावा, यासाठी ते विचार दर्शविणारीं अवतरणें मुद्दाम पुढे देत आहों —

पांगूळ[३]

भरत गा खंडामाजी — शरयूतीर बा गांव
धर्माचें नगर तेथें — राज्य करी रामराव
पांगुळां पाय देतो — देव जानकीचा नाथ
जाईन मी तया ठाया — देवा उत्तम तो ठाव ...१.

राघवाचा धर्म जागो — सर्व अधर्म भागो
अज्ञान निरसोनीयां — विज्ञानीं लक्ष लागो ॥ ध्रु. ॥

मीपणाचे मोडले पाय — म्हणउनि पांगुळ जालों
तूंपणाची कीर्ती देईं — ऐकोनीया शरण आलों
मीतूंपण निरसी माझें — भजनभिंतीवरि बैसलों
प्रेमफडकें पसरोनियां — कृपादान मागों आलों ॥ राघवाचा ...२.

१. 'तुमचा अभिप्राय एकसारखा, तुमचीं अंतःकरणें एकसारखीं, व तुमचें मन एकसारखें असो; जेणेंकरून तुमचें सुसाह्य म्हणजे संघशक्तीची बळकटी होईल.' (टिळक.)

२. 'येथे सव सुखी होवात; सर्व निरोगी होवोत; सर्वजण कल्याणप्रद गोष्टी अनुभवोत; कोणालाहि दुःखाचा वाटा येऊं नये.'

३. ज्याचे मीपणाचे पाय मोडलेले आहेत असा.

जनीं एक तूंचि दाता झणुनि आलों मागावया
मागणें निरसे जेणें ऐसें दे गा रामराया
नवविधा दुभतें देईं भाव हलगा[1] बैसावया
ज्ञानकाठी देईं करीं वैराग्य वोल[2] पांघराया ॥ राघवाचा ...३.
दासी[3] हातीं देववीसी तें मी नेघे सर्वथा
द्वैतदान नेघे जाण दोन वेळे आणीतां
अपूर्णता देऊं नको पूर्ण करी निःकामता
आपणाऐसें दान देईं तूं तरि इच्छेचा दाता ॥ राघवाचा ...४.
तुझे कृपेचा कांबळा देईं मज पांगुळाकारणें
माया मोहो हीववातें तें हें निवारे जेणें
निःकामता भाकर देईं कामक्षुधा हारे जेणें
बोधाचें ताक पाजीं शब्द खुंटे धालेपणें ॥ राघवाचा ...५.
रामदास पांगुळासी रामें दिधलीयां दान
घेणेंचि निरसलें कैंची मागण्याची खूण
देणें घेणें निरसोनीयां पूर्ण केलें परिपूर्ण
दाता ना याचक तेथें सहजीं सहज संपूर्ण ॥राघवाचा ...६.

समर्थसंजीवनी (लक्ष्मण रामचंद्र पांगारकर):
पृ. २५९–२६०.

मा न पं च क

राज्य या रघुनाथाचें कळिकाळासि नातुडे
बहुवृष्टी अनावृष्टी हें कदा न घडे जनीं ७.
उद्वेग पाहातां नाहीं चिंतामात्र नसे जनीं
व्याधी नाहीं रोग नाहीं लोक आरोग्य नांदती ८.
युद्धय नाहिंच अयोध्या राग ना मत्सरु नसे
बंदनिबंदही नाहिं दंडदोष कदा नसे ९.
कुरूपी पाहातां नाहिं जरा मृत्य असेचि ना
आदरु सकळै लोका सख्यप्रीती परस्परें १०.
बोलणें सत्य न्यायाचें अन्याय सहसा नसे
अनेक वर्तती काया एकजीव परस्परें ११.
दरिद्री धुंडितां नाहीं मूर्ख हा तो असेचि ना
परोपकार तो मोठा सर्वत्र लोकसंग्रहो १२.

१. झोपाळा. २. फाटकें रकटें. ३. माया.

अद्भुत पिकती भूमी वृक्ष देती सदा फळें
अखंड दुभती धेनु आरोग्यें वाहाती जळें १३.
जळजें स्वापदें पक्षी नाना जीव भुमंडळीं
आनंदरूप बोभाती[1] नाना स्वर परस्परें १४.
नद्या सरोवरें बावी डोलती नूतनें बनें
फळती फुलती झाडें सुगंध वनवाटिका १५.
उदंड वसती ग्रामें नगरें पुरेंचि पट्टणें
तीर्थें क्षेत्रें नानास्थानें शिवालयें गोपुरें बरीं १६
मठ मढ्या पर्णशाळा ऋषिआश्रम साजिरे
वेदशास्त्रधर्मचर्चा स्नानसंध्या तपोनिधी १७.
चढता वाढता प्रेमा सुखानंद उचंबळे
संतोष समस्तै लोकां रामराज्य भुमंडळी १८.

श्रीसमर्थ ग्रंथभांडार (पूर्वार्ध व उत्तरार्ध)
संग्राहक : लक्ष्मण रामचंद्र पांगारकर : पृ. १०३ (उत्तरार्ध)

'पसायदाना'च्या टीपांमध्ये आम्ही राजवाडे, फाटक, थिगळे, साखरे, भिडे, कुंटे, दांडेकर, माडगांवकर, राजवाडे-प्रतीची सरकारी आवृत्ति यांच्या पाठांचा ठिकठिकाणीं निर्देश केलेला आहे, तो त्यांच्या-त्यांच्या संक्षिप्त निर्देशांवरून सहज ध्यानीं येईल. रा-पाठ (= राजवाडे-पाठ) हा आज उपलब्ध असलेल्या सर्व पाठांमध्ये प्राचीन आहे, हें सर्वसंमत झालें आहे. त्या पाठाचें अधिकतम समर्थन कितपत करितां येईल, हा हेतु ठेवून अर्थ व टीपा लिहिलेल्या आहेत; आणि त्याच्या अनुरोधाने इतर पाठांची साधार चर्चा केलेली आहे. या सर्वांचा हेतु एकच आहे : तो हा की, ज्ञानियांच्या या राजाला जो अभिप्राय सर्व विश्वाला उद्देशून व्यक्त करावयाचा आहे, त्याच्या जवळांत जवळ जातां यावें, आणि त्याला सर्वांत जवळ असलेली भाषा, शब्द व अर्थ हे साक्षेपाने समजून घ्यावे. या एका हेतूने रचिलेली ही पुस्तिका आम्ही त्याच्याच चरणीं अर्पण करीत आहों.

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु ।
सह वीर्यं करवावहै । तेजस्वि
नावधीतमस्तु । मा
विद्विषावहै ।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

'पामीर',
२०५७, सदाशिव,
पुणें-२.

दि. ६ डिसेंबर, १९६१
ज्ञानदेव-पुण्यतिथि
कार्तिक वद्य १३, शके १८८३

अरविंद मंगरूळकर
विनायक मोरेश्वर केळकर

१. संवाद करितात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32882 वि: निबंध
क्रमांक 93CC नों: दि: 23/3/82

प्रस्तुत ‘ पसायदाना ’ची संहिता आचार्य विष्णु प्रभाकर लिमये यांनी वाचून ज्या कांही बहुमोल सूचना केल्या, त्यांबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञ आहों. त्यांच्या बहुतेक सूचनांचा आम्हीं येथे समावेश केला आहे.

व्याकरणाच्या अधिक स्पष्टीकरणासाठी प्रस्तुत संपादकांचा ‘ ज्ञानदेवी : बारावा अध्याय ’ (पृष्ठ १३–२७) पहा.

संहिता, अन्वय-अर्थ

आतां विश्वात्मकें देवें । एणें वाग्यज्ञें तोषावें
तोखौनि मज देयावें । पसायदान हें १७७२
जें खलांची वांकुडै मोडे । तेयां सत्संगीं रति वाढे
भूतां परस्परें पडे । मैत्र जीवाचें १७७३

अन्वय. १७७२ – १७७३. आतां विश्वात्मकें देवें एणें वाग्यज्ञें तोषावें; तोखौनि मज जें खलांची वांकुडै मोडे, तेयां सत्संगीं रति वाढे, भूतां परस्परें जीवाचें मैत्र पडे, हें पसायदान देयावें.

अर्थ. आता विश्व हा ज्याचा आत्मा (= स्वरूप) आहे, अशा देवाने या वाग्रूप यज्ञाने संतुष्ट व्हावें, (आणि) संतुष्ट होऊन मला जें दुर्जनांची कुटिलता मोडून काढितें, त्यांची संतसंगाच्या ठायीं प्रीति वाढवितें, (आणि) प्राणिमात्रांची एकमेकांशीं जिवाभावाची मैत्री उत्पन्न करितें, (असें) हें प्रसादाचें दान द्यावें.

दुरिताचें तिमिर जाॐ । विश्वा स्वधर्मसूर्यों पाहो
वांछिल तें तें लाहो । प्राणिजात १७७४

अन्वय. १७७४. दुरिताचें तिमिर जाॐ; स्वधर्मसूर्यों विश्वा पाहो; प्राणिजात वांछिल तें तें लाहो.

अर्थ. पातकाचा (दुष्कृत्याचा) अंधकार नष्ट होवो; स्वधर्मरूप सूर्य विश्वाला प्रकाशित करो; प्राणिमात्र (जें-जें) इच्छील, तें-तें (त्याला) लाभो.

वर्षतें सर्वमंगलीं । इश्वरनिष्ठांची मांदियली
अनव्रत भूतलीं । भेटोतु भूतां १७७५

अन्वय. १७७५. इश्वरनिष्ठांची मांदियली सर्वमंगलीं वर्षतें, भूतलीं भूतां अनव्रत भेटोतु.

अर्थ. ईश्वरनिष्ठांचे (= ईश्वरनिष्ठ जनांचे) (जे) मेळावे सर्व मंगलांची बरसात करितात, (ते) भूमंडलावर प्राण्यांना सदैव भेटोत.

चलां कल्पतरूचे आरव । चेतवाचिंतामणिचे गावं
बोलते पां अर्णव । पीयूखांचे १७७६

चंद्रमे जे आलंछन । मार्त्तंड जे तपहीन
ते सर्वां हीं सदा सज्जन । सोयरे होंतु १७७७

अन्वय. १७७६–१७७७. (जे) चलां कल्पतरूचे आरव, (जे) चेतवा चिंतामणिचे गावं, (जे) पीयूखांचे बोलते अर्णव पां, जे आलंछन चंद्रमे, जे तपहीन मार्त्तंड, ते सज्जन सर्वांहीं सदा सोयरे होंतु.

अर्थ. जे चालत्या कल्पवृक्षांचीं उद्यानें, चैतन्यदायक चिंतामणींचे गांव, (आणि) खरोखर अमृताचे (चालते-)बोलते समुद्र, (तसेंच,) जे कलंकावाचून (असलेले) चंद्र (आणि प्रखर) उष्णतेवाचून सूर्य (आहेत), ते संत सर्वांनाच नेहमी ज्ञातिबांधव होवोत.

किंबहुना सर्वसुखीं । पूर्णा होउनि तिहिं लोकिं
भजिजो आदिपुरुषीं । अखंडित १७७८

अन्वय. १७७८. किंबहुना, तिहिं लोकिं सर्वसुखीं पूर्णा होउनि आदिपुरुषीं अखंडित भजिजो.

अर्थ. फार काय, त्रिभुवनाने सर्व सुखांनी परिपूर्ण होऊन आदिपुरुषाच्या ठायीं अखंड भक्ति करावी.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषें लोकीं इये
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी १७७९

अन्वय. १७७९. आणि जी, विशेषें इये लोकीं ग्रंथोपजीविये दृष्टादृष्टविजयें होआवें.

अर्थ. आणि अहो, विशेषतः ह्या लोकीं (गीता-)ग्रंथावर ज्यांचें जीवन (विश्वसलेलें) आहे, ते दृष्ट आणि अदृष्ट (अशा सर्व गोष्टीं)बाबत विजयी व्हावे.

एथ ह्मणे विश्वेसरु राउ । हा होईल दाओ पसाउ
एणें वचनें ज्ञानदेउ । सुखिया जाला १७८०

अन्वय. १७८०. एथ विश्वेसरु राउ म्हणे, 'हा पसाउ दाओ होईल.' एणें वचनें ज्ञानदेउ सुखिया जाला.

अर्थ. या स्थळीं विश्वेश्वर-राज म्हणतो, 'हा प्रसाद दिला जाईल.' या बोलण्याने ज्ञानदेव सुखावला.

टीपा : विवेचन

१७७२–१७७३.

आतां – यापुढे; अर्थात् 'सिद्धी गेलें धर्मकीर्तना'च्या (१८·१७७१) नंतर. यापुढील ओव्या ग्रंथाच्या उपसंहाराच्या आहेत. **विश्वात्मकें देवें** – संपूर्ण (दृष्टादृष्ट) विश्व हा ज्याचा आत्मा आहे अशा देवाने. कर्तरि तृतीया. पहा – सर्वं खल्विदं ब्रह्म। हें निराकार सगुणाचें वर्णन आहे. संपूर्ण विश्व हें खरोखर परमात्म्याचेंच स्फुरण, स्वरूप होय, असा भाव. 'विश्वाचा आत्मा असलेल्या देवाने' असाहि अर्थ होऊं शकेल. **एणें वाग्यज्ञें** – तृतीयांत पदें. करणे तृतीया. **वाग्यज्ञें** – वाग्रूप यज्ञाने, वाङ्मययज्ञाने. 'भावार्थदीपिके'ची रचना हा वाङ्मययज्ञच होय, असा भाव. **देयावें** – रा-फा-व्यतिरिक्त इतर सर्व प्रतींत 'द्यावें' असा आधुनिकीकरण केलेला पाठ आहे. **पसायदान** – प्रसाददान. 'देवें हें पसायदान देयावें,' हें मुख्य वाक्य आहे. 'हें पसायदान' याचें वर्णन करणारीं तीन गौण विशेषणवाक्यें पुढील १७७३-व्या ओवींत आहेत. **जें** – 'पसायदान' या पदाचा परामर्श करणारें आणि 'मोडे', 'वाढे', 'पडे' या गौण वाक्यांमधील क्रियापदांचा कर्ता असलेलें पद. **वांकुडै** – वांकुड + ऐ. वाकडेपणा, कुटिलता. 'ऐ' हा भाववाचक नामाचा प्रत्यय आहे. (जसें, सेवकै, पाइकै, इत्यादि.) आधुनिक मराठींत याचें '-आई' असें रूपांतर झालेलें आहे. (जसें, चतुराई, भलाई, बुराई, इत्यादि.) 'वांकुडै' हा पाठ फक्त रा-फा-प्रतींतच आहे. इतर प्रतींत वंकटै(मा), वंकटें, वंकटैं, व्यंकटै, विकटै, व्यंकटें, व्यंकट (मा-टीप), व्यंकटी (सा, भि, दां, कुं) असे पाठ आहेत. **मोडे** – √मोड (< √मुड्) वर्तमान. तृ. पु. ए. व. नष्ट करितें. √मोड येथे सकर्मक आहे. 'वांकुडै' हें त्याचें कर्म. येथे ज्ञानदेवांनी 'दुष्टांचा नायनाट होवो,' असें न म्हणतां 'त्यांची केवळ कुटिलता मोडावी,' एवढेंच प्रार्थिलें आहे, हें लक्षणीय आहे; कारण ज्याची कुटिलता मोडली, तो मनुष्य मूलतः चांगलाच, अशी त्यांची धारणा आहे. मानवाच्या मूलभूत सत्प्रवृत्तीवर ज्ञानदेवांची किती ही गाढ श्रद्धा आहे! **तेयां** – षष्ठ्यंत पद. त्यांची. **सत्संगीं** – रा-फा-मा (टीप) यांव्यतिरिक्त इतर प्रतींत 'सत्कर्मिं(र्मीं)' असा पाठ आहे. **वाढे** – √वाढ (< √वृध्) वर्तमान. तृ. पु. ए. व. वाढवितें. अन्तर्भावितण्यर्थ. पहा – लावीं = लाववीं – १२ · १३. **पडे** – √पड (< √पत्) वर्तमान. तृ. पु. ए. व. जडवितें. अन्तर्भावितण्यर्थ. 'वाढे', 'पडे' ही क्रियापदें प्रयोजकार्थक आहेत. १७७२–१७७३ या दोन ओव्यांत मिळून एक मिश्र वाक्य आहे; मुख्य क्रियापद 'देयावें'. संबंध असा – '...देवें हें पसायदान देयावें, जें ...

वांकुडै मोडे, ... रति वाढे, ... मैत्र पडे.' 'देवाने हें प्रसाददान द्यावें की, जें कुटिलताभंजक आहे, सत्संगरतिवर्धक आहे, ... मैत्रोत्पादक आहे, ' असा त्याचा अर्थ. या दोन ओव्यांत (१७७२–१७७३) अमूक-अमूक प्रकारचें पसायदान द्यावें, अशी केवळ विनवणी आहे. साक्षात् पसायदानाच्या याचनेला सुरवात १७७४-व्या ओवीपासून आहे. 'मोडे', 'वाढे', 'पडे' हे पाठ फक्त रा-फा-थि याच प्रतींमध्ये आहेत. इतर सर्व प्रतींत 'मोडो', 'वाढो', 'पडो' असे पाठ आहेत. त्या पक्षीं 'जें' हें अव्यय मानून त्याचा अर्थ 'की' असा करावा लागेल; आणि मग साक्षात् पसायदान-याचनेला सुरवात १७७४-पासून न होतां १७७३-पासूनच होईल. कारण आज्ञार्थी क्रियापदांचा आरंभ तेथूनच होतो. 'पसायदाना'च्या या उत्तरोक्त पारंपरिक व्यवस्थेंत प्रथमच खलांविषयीचें मागणें येतें; नंतर इतर भाग येतो. रा-पाठानुसार पाहतां '... कुटिलताभंजक', 'सत्संगरतिवर्धक', '...मैत्रोत्पादक' हीं 'पसायदाना'चींच विशेषणें होतात आणि 'दुरिताचें तिमिर जाऊ' अशी पसायदान-याचनेला यथार्थ सुरवात होते. रा-फा-पाठ व इतर पाठ यांतील हा सूक्ष्म भेद ध्यानांत घेण्याजोगा आहे.

१७७४.

विश्वा स्वधर्मसूर्यो पाहो – 'स्वधर्मरूप सूर्य विश्वाला प्रकाशित करो.' √पाह (<प्र+√भा) आज्ञार्थ तृ. पु. ए. व. 'पाह' हा धातु सकर्मक असून '°सूर्यो' हा त्याचा कर्ता व 'विश्वा' हें कर्म होय. 'विश्वा' हें षष्ठ्यंत पद येथे कर्मस्थानीं आहे. येथे लक्षणीय हें की, प्र + √भा हा धातु संस्कृतांत कोठेहि सकर्मक नाही. नाही म्हणावयास तैत्तिरीयोपनिषदांत एके ठिकाणीं (१·४) 'प्र मा भाहि' (Shine upon me)', 'प्र मा पद्यस्व' (Come unto me) असे प्रयोग आलेले आहेत. **वांछिल** – 'प्राणिजात' हा या क्रियापदाचा कर्ता आणि 'जें जें' हीं अध्याहृत पदें कर्म. **लाहो** – √लाह (< लाभ; √ला) आज्ञार्थ तृ. पु. ए. व. मिळवो, प्राप्त करो. फा-प्रतींतील या ओवीचा पाठ तंतोतंत रा-पाठाप्रमाणेच आहे. थि-प्रतींतील उत्तरार्धाचा पाठ रा-पाठाप्रमाणेच आहे. इतर प्रतींत पुढीलप्रमाणे पाठभेद आहेत : विश्व स्वधर्मसूर्यें – सा, भि, दां, कुं, मा. विश्वा (विश्वीं) स्वधर्म(र्मे)सूर्य – मा (टीप). विश्वा स्वधर्में सूर्यें – थि. 'विश्व स्वधर्मसूर्यें पाहो' या पाठांत 'पाहो' हें क्रियापद अकर्मक आहे, आणि 'स्वधर्मसूर्यें' ही करणे तृतीया. 'विश्व स्वधर्मसूर्याने उज्ज्वल होवो,' असा अर्थ. 'विश्वा स्वधर्मसूर्य पाहो' हा मा(टीप)-प्रतींतील पाठ रा-पाठासारखा आहे, हें उघड आहे. 'विश्वा' याच्या स्थानीं 'विश्वीं' असा पाठ (मा-टीप) घेतल्यास 'पाहो' हें क्रियापद अकर्मक घ्यावें. 'स्वधर्मसूर्य विश्वांत प्रकाशो,' असा त्याचा अर्थ. यांव्यतिरिक्त इतर पाठ निर्दोष नाहीत. पहा – ज्ञानेश्वरीचा अभ्यास (वि. मो. केळकर) : पृ. १८०–१८२. ओवीच्या उत्तरार्धांत मात्र केवळ रा-पाठच व्याकरणदृष्ट्या शुद्ध आहे. फा-थि- प्रतींतहि

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे क्र. ११४५३

तोच पाठ आहे. इतर प्रतींतील 'जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात' हा पाठ अशुद्ध आहे. कारण 'ज्ञानदेवीं'त 'जात' (=समूह) हा शब्द **सर्वत्र नपुंसकलिंगी** असल्यामुळे 'जो-तो' या पुंलिंगी सर्वनामात्मक पदांशीं त्याचा अन्वय होणें अशक्य आहे. 'जात' म्हणजे 'समुदाय' हा शब्द मुळांत संस्कृतांत आणि 'ज्ञानदेवीं'तहि निरपवादपणें नपुंसकलिंगी आहे. पहा – नासे क्रियाजात आघवें । १८·९६६; काम्य कीजे जेतुकें । क्रियाजात । १८·५९९ ; आणि स्त्रीजात जेतुकें । १८·५५८; इत्यादि. प्रस्तुत ओवीविषयी श्री. द. वें. केतकर[1] आणि कै. ज. स. करंदीकर[2] यांचीं मतें आमच्याप्रमाणेच आहेत. त्या उभयतांना राजवाडे-पाठ व तदनुसार होणारा अर्थ हाच ग्राह्य वाटतो. आचार्य वि. प्र. लिमये यांना मात्र या बाबतींतलें विवेचन पटलेलें नाही;[3] परंतु त्याचा त्यांनी कांही खुलासा केलेला नाही. 'प्रतिष्ठान'-मासिकाच्या डिसेंबर १९५८-च्या अंकांत श्री. भा. रं. कुळकर्णी यांनीहि कांही विवेचन केलें आहे. (पहा– पृ. २०.) परंतु त्या विवेचनांत संभ्रम दिसतो. (१) त्यांनी राजवाड्यांच्या पाठांतील म्हणून उद्‌धृत केलेली ओवी हीच मुळी प्रथम राजवाडे-पाठांतील नाही. (२) त्यामुळे 'तिचें व्याकरण दुरुस्त करण्याचा आव आणण्याचा' प्रश्नच नाही. किंबहुना, रा-पाठ हाच कसा बरोबर आहे, हें वर दाखविलेंच आहे. (३) त्यांनी 'प्राणिजात' म्हणजे 'प्राणिमात्रांची जात' असा अर्थ केला आहे, तो निखालस चुकीचा आहे. 'ज्ञानदेवीं'त 'जात' हा शब्द समुदाय अशाच अर्थानें येतो; 'जाति' या अर्थानें येत नाही. (पहा – भावे व वेलिंगकर यांचे कोश.) 'जात' यांतील प्रथम वर्णाचा उच्चार कुळकर्णी यांना वाटतो (– असें उघडच दिसतें –), तसा दंत्यतालव्य नसून केवळ **तालव्य** आहे. (जसें, **जा**न्हवी, **जा**या, **जा**मात, **जा**तक, इत्यादि.) '**जात**' (तालव्य) आणि '**जात**' (दंत्यतालव्य) या दोन शब्दाच्या उच्चारांमध्ये त्यांनी केवळ गल्लत केली आहे, आणि परिणामीं ती भूल त्यांच्या अर्थामध्ये उतरली आहे. (४) ओवीच्या दुसऱ्या चरणाचा खुलासा वर केलेलाच आहे. तदनुसार 'स्वधर्मसूर्यें' ही करणे तृतीया घेतली, तर 'पाहो' हें क्रियापद अकर्मक घ्यावें लागेल, याची जाणीव श्री. कुळकर्णी यांच्या लेखनांत दिसत नाही. कारण त्यांनी 'पाहण्याचें कार्य विश्वहि करू शकतें,' असें लिहिलें आहे.– पण म्हणजे काय? 'पाह' हा धातु येथे सकर्मक ?– अर्थात् नाही. (५) द्वितीया विभक्तीविषयी केळकरांनी जें लिहिलें आहे, तो प्रसिद्ध वैयाकरण कै. गोविंद कृष्ण मोडक यांचा अनुवाद आहे आणि तें मत बरोबर आहे, असें सिद्ध करितां येईल.

१. पहा – नवभारत : वर्ष १२, अंक ५, फेब्रुवारी १९५९, पृ. ४३.

२. पहा – केसरी : १–७–१९५८, पान ६.

३. पहा – ज्ञानेश्वरीचा अभ्यास : भाग पहिला : 'प्रकाशकाचा पुरस्कार' : पृ. १६–१७.

१७७५.

वर्षतें – √वर्ष (< √वृष्र्) वर्तमान. तृ. पु. अ. व. वर्षतात, बरसात करितात. ' मांदियली ' हा या क्रियापदाचा अनेकवचनी कर्ता. शोभे (ए. व.), **शोभते** (अ. व.) ; याप्रमाणे वर्षे (ए. व.), **वर्षते** (अ. व.). पहा – **तियें** मुकुटीं **कुसुमें** सुगंधें। **शोभते** भलीं ॥ १·१८. ' वर्षतें ' याच्या अंतींचा अनुस्वार अकिंचित्कर आहे. ' इश्वरनिष्ठांची (जियें) मांदियली सर्वमंगलीं वर्षतें, (तियें)... भूतां... भेटोतु, ' असें मिश्रवाक्य घेऊन अन्वय करावा. ' वर्षतें ' याचे पाठभेद पुढीलप्रमाणे आहेत : वर्षतें – रा, फा, भि, मा; वर्षत – सा, कुं, दां; वर्षोत – मा (टीप). यांवरून कांही प्रतींत ' वर्षतें ' हा पाठ सुगम करून ' वर्षत ' असा, किंवा ' भेटोतु ' या पुढील आज्ञार्थी अनेकवचनी क्रियापदाशीं समरूप करून ' वर्षोत ' असा घेतलेला दिसतो. ' वर्षत ' हा पाठ घेतला, तर सर्व ओवीचें एकच केवल-वाक्य होतें; ' वर्षतें ' या पाठाने वर दर्शविल्याप्रमाणे मिश्रवाक्य होतें; आणि ' वर्षोत ' या पाठाने ओवींत दोन स्वतंत्र वाक्यें होतात. **सर्वमंगलीं** – तृतीयांत अनेकवचनी पद. ' सर्व (प्रकारच्या) मंगलांनी ' असा अर्थ. पहा – आनंदे वर्त्ततिये – १२·१. **इश्वरनिष्ठांची मांदियली** – इश्वरनिष्ठांचें मांदियलें (ए. व.), इश्वरनिष्ठांचीं मांदियलीं (अ. व.). येथे आम्ही ' मांदियलें ' असा एं-कारांत नपुंसकलिंगी मूळ शब्द मानितों. त्याचें प्रथमांत अनेकवचन ' मांदियलीं ' असें होईल, आणि मग ' इश्वरनिष्ठांची ' हेंहि पद नपुंसकलिंगी प्रथमांत अनेकवचनी होईल. ' मांदियली ' हें पद ' ज्ञानदेवीं 'त केवळ येथेच आलेलें आहे. अर्थात् ' मांदियलें ' (नपुं.) म्हणजे ' समूह, मेळावा ' हा शब्द ' ज्ञानदेवीं 'त अन्यत्र आढळत नाही. परंतु महाराष्ट्र-शब्दकोशांत तो तसा दिलेला आहे. कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी ' मांदें ' असा नपुंसकलिंगी शब्द देतात. राजवाडे ' मांदी ' याचें मूळ ' मण्डि ' असें देतात. ' बृन्द ' (= समूह) यापासून ' मांदें ' याची उत्पत्ति सुचवितां येण्यासारखी आहे, असें आम्हांला वाटतें. या पक्षीं नपुंसकलिंगाचा निर्वाह होण्यासारखा आहे; आणि ' मांदियलें ' (नपुं.) हा मांदी, मांदें, मांदियली यांच्या संभ्रमाने त्याचाच अतिदेश झाला असावा, असें निर्वचन करितां येईल. ' इश्वरनिष्ठांची ' या पदांतील आद्य इ-कार लकब म्हणून अथवा नकलकाराच्या हस्तदोषाने ऱ्हस्व आलेला दिसतो. कदाचित् पुढील ' श्व ' या संयुक्त व्यंजनाच्या अस्तित्वाने ' इ ' गुरु होत असल्यामुळे त्याच्या दीर्घत्वाची तादृश आवश्यकता वाटली नसावी. सरकारी रा-प्रतींत कांहीहि आधार, मूळ वा कारण न देतां तो दीर्घ केलेला आहे. **अनव्रत** – (< अनवरत = अन् + अवरत) अखंड, सतत, सदैव. **भेटोतु** – √भेट (< भिट्ट – प्रा. [कुलकर्णी]; अभि + आ + √इट् [राजवाडे]; अभि + √स्था [राजवाडे]) आज्ञार्थ तृ. पु. अ. व. √भेट याची व्युत्पत्ति संशयित दिसते. आचार्य वि. प्र. लिमये ' अभ्यर्थ् ' असें मूळ सुचवून संशय व्यक्त करितात. प्रस्तुत ओवीच्या वरील विवेचनावरून रा-प्रतींतील पाठ व्यवस्थितपणें समर्थित होतो, असें दिसेल.

१७७६ – १७७७.

या ओव्यांत सज्जनांचें वर्णन आहे. १७७६-वी ओवी आणि १७७७-चा पूर्वार्ध यांत एकंदर पांच गौण विशेषणवाक्यें असून मुख्य वाक्य १७७७-च्या उत्तरार्धांत आहे. **चलां** – चल (वि.) पुं. षष्ठी अ. व. चालत्या (कल्पवृक्षांचे). ‘ कल्पतरूंचे ’ याशीं अन्वित. **आरव** – आरव (पुं.) (< आराम) प्रथमा अ. व. उद्यानें. **चेतवाचिंतामणिचे** – हा नकलकाराचा हस्तदोष अथवा अपपाठ असावा, अशा कल्पनेने बहुसंख्य प्रतींत ‘ चेतनाचिंतामणिचे ’ (= चैतन्यरूप चिंतामणींचे) असा पाठ करून घेतलेला आहे. आम्हीं ‘ चेतवा चिंतामणिचे ’ असा त्याचा फक्त छेद केलेला आहे. (अन्वय पहा.) ‘ चेतव ’ याचें मूळ √चित् हें असून ‘ चेतव ’ (= प्राणशक्ति चेववणार, प्राणशक्तिप्रद) हें त्यापासून प्रयोजक रूप आहे. ‘ चेतवा (षष्ठी अ. व.) चिंतामणिचे ’ म्हणजे ‘ चैतन्यदायक चिंतामणींचे ’ असा अर्थ करावा, असें आम्ही सुचवितों. या पक्षीं ‘ चेतवा ’ हें मागील चरणांतील ‘ चलां ’ याप्रमाणे षष्ठ्यंत अनेकवचनी पद मानून ‘ चिंतामणिचे ’ याशीं अन्वित करावयाचें. महाराष्ट्र-शब्दकोशामध्ये ‘ चेतव ’ (पुं.) म्हणजे ‘ प्राणशक्ति ’ असा अर्थ दिलेला आहे. आम्हीं केलेल्या अन्वयाला उपोद्बलक कारणें अशीं : (१) रा-फा-थि या प्रतींत कटाक्षाने ‘ चेतवा ’ असाच पाठ आहे. (तथापि सरकारी राजवाडे-प्रतींत मात्र ‘ चेतना– ’ असा पाठ स्वीकारून ‘ चेतवा– ’ या मूळच्या रा-पाठाची नुसती दखलहि घेतलेली नाही, हें आश्चर्य आहे !) (२) ओवीच्या पूर्वीच्या चरणांत ‘ चलां ’ हें ‘ आरव ’ याचें विशेषण आहे. तसेंच, पुढेहि ‘ बोलते ’ हें ‘ अर्णव ’ याचें, ‘ आलंछन ’ हें ‘ चंद्रमे ’ याचें आणि ‘ तपहीन ’ हें ‘ मार्त्तंड ’ याचें विशेषण आहे. पाचांमधील चार विशेषणवाक्यांत आगेमागे मिळून चार विशेषणें आलीं, तर उरलेल्या पांचव्या विशेषणवाक्यांत सदृश विशेषणाची अपेक्षा प्रवाह-पतितन्यायाने करणें हें वाजवी आहे. (३) ‘ चेतवा ’ याचा अर्थ ‘ चेतना॰ ’ याहून अधिक चांगला जमतो. ‘ चेतनारूपी चिंतामणीचे गांव ’ म्हणजे काय ? – यांत प्रथम चेतनेवर चिंतामणीचा अध्यारोप व नंतर सज्जनांवर चिंतामणिरूप गांवांचा अध्यारोप होतो. अशा प्रकारचीं दुहेरी स्वरूपांचीं आरोप्य-आरोपितें व त्यांची योजना प्रस्तुत ओव्यांत अन्यत्र आढळत नाही. उलटपक्षीं, ‘ चेतवा ’ म्हणजे ‘ चैतन्यदायक ’ हा अर्थ प्रस्तुत स्थळीं कसा साभिप्राय आहे पहा – चिंतामणि हे जड म्हणजे अचेतन असतात; परंतु सज्जन हे मात्र चैतन्यदायक आहेत, असा येथे व्यतिरेकाचा ध्वनि आहे. असाच व्यतिरेकाचा अथवा आधिक्याचा ध्वनि चालते कल्पतरु, बोलते समुद्र, कलंकहीन चंद्र, तापविरहित सूर्य याहि रूपकांमध्ये आहे, हें उघड आहे. तेव्हा ‘ चेतवा ’ म्हणजे ‘ चैतन्यदायक ’ हा अर्थ प्राचीनत्व, सुसंगतता, अलंकार, संदर्भ या सर्वच दृष्टींनी ग्राह्य आहे. सज्जनांच्या संदर्भात येथे जीं रूपकें योजिलीं आहेत, तशा रूपकांना ‘ रसगंगाधर’कार जगन्नाथपंडिताने ‘ दृढारोप-रूपक ’ आणि ‘ साहित्यदर्पण’कार विश्वनाथाने ‘ अधिकारूढवैशिष्टयरूपक ’ असें नांव

दिलें आहे. येथील अलंकारांत कांही स्थळीं (जसें, आलंछन, तपहीन) श्लेषहि आहेच. **बोलते** – बोलत (वि.) पुं. प्रथमा अ. व. हें ‘ अर्णव ’ या पदाचें विशेषण. **अर्णव** – (< अर्णस्) समुद्र. **पीयूखांचे** – पीयूषाचे, अमृताचे. **चंद्रमे** – चंद्रमा (पुं.) प्रथमा अ. व. **आलंछन** – ‘ अलांछन ’ या पदांतील पहिल्या दोन अक्षरांमधील स्वरांचा विपर्यय होऊन प्रस्तुत ‘ आलंछन ’ हें रूपांतर झालेलें आहे. मराठींत अशा स्थळीं अ व आ हे नकारार्थी एकरूप मानितां येतील, असेंहि वाटतें. ‘ निष्कलंक, कलंकरहित ’ असा त्याचा अर्थ. सज्जन चंद्रासारखे शीतल, आल्हाददायक, मधुर असूनहि चंद्राच्या ठिकाणचा कलंक (श्लेषाने, दोष, काळिमा) त्यांच्या ठायीं मुळींच नाही, असा भाव. अपेक्षित नञर्थक अ-च्या स्थानीं ‘ ज्ञानदेवीं’त कधी-कधी ‘ आ ’ आढळतो; जसें, आरोचक (१२·१०६). **मार्त्तंड** – सूर्य. **तपहीन** – ‘ तप ’ यावर श्लेष आहे. (१) सूर्यपक्षीं – (प्रखर) उष्णता; (२) सज्जनपक्षीं – दुःखदता **सर्वां** – षष्ठ्यंत पद. **सोयरे** – सोयरा (पुं.) (< सहोदर → सोयर – प्रा.) प्रथमा अ. व. ज्ञातिबांधव, आप्तस्वकीय, इष्ट. **होंतु** – √हो आज्ञार्थ तृ. पु. अ. व. होवोत.

१७७८.

सर्वसुखीं – तृतीयांत अनेकवचनी पद. सर्व (प्रकारच्या) सुखांनी. **पूर्णा** – आं-कारांत क्रियाविशेषण. परिपूर्ण. **तिहिं लोकिं** – तृतीयांत अनेकवचनी पदें. तिन्ही लोकांनी, त्रिभुवनाने. ‘ भजिजो ’ याचा कर्ता. **भजिजो** – √भज (< √भज्) कर्मणि आज्ञार्थ तृ. पु. ए. व. भक्ति केली जावी. **आदिपुरुषीं** – सप्तम्यंत ए. व. आदिपुरुषाच्या ठिकाणीं. ही विषयसप्तमी दिसते. एरवी, ‘ भजिजो ’ या कर्मणि क्रियापदाचें हें कर्म आहे; आणि म्हणून ‘ आदिपुरुष ’ असें प्रथमांत पद अपेक्षित आहे. ओवीच्या यमकांत सांपडल्याकारणाने प्रथमेच्या स्थानीं येथे सप्तमी विभक्ति योजिली असेल काय ?

१७७९.

ग्रंथोपजीवियें – ग्रंथोपजीवी (पुं.) प्रथमा अ. व. ग्रंथावर ज्यांचें जीवन आहे असे. येथे ‘ ग्रंथ ’ याने ‘ गीते’चा निर्देश आहे, ‘ ज्ञानदेवी’चा नाही. ‘ ज्ञानदेवी ’ हे ‘ गीते’चें भाष्य आहे, आणि ज्ञानदेवांना गीतेच्याच अपार प्रतिष्ठेविषयीचा विचार येथे अभिप्रेत आहे, हें स्पष्ट आहे. गीता-ग्रंथावर ज्या एकनिष्ठ भक्तांचें जीवन भरवसलेलें आहे, त्यांच्याविषयीची पसाययाचना या ओवीमध्ये आहे. पहा – हे गीता नावं विख्यात । सर्ववाङ्मयाचें मथित । आत्मा जेणें हस्तगत । रत्न होए ॥ १८·१३१४; गीता जाणा हे वाङ्मई । श्रीमूर्त्ति प्रभूची ॥ १८·१६६३ ॥ तसेंच, पहा – १·५० – ६२; १·७०–७३; १८·१६४०; १८·१६४५; १८·१६७४. १८-व्या अध्यायांतील १४९९ ते १५१३ या ओव्या पाहिल्या असतां ज्ञानदेवांचा गीतेच्या प्रसाराविषयीचा कल स्पष्ट होतो, आणि मग ‘ ग्रंथ ’ या पदाने ज्ञानदेवांच्या मतीं गीतेचाच येथे निर्देश आहे. हें निःसंदिग्धपणें सिद्ध होतें. हें लक्षांत घेतां माधव दामोदर आळतेकरांनी या ओवींतील

'ग्रंथ'पदाचा संदर्भ 'ज्ञानदेवी'शीं जोडून मग ती ओवी प्रक्षिप्त मानण्याची जी कल्पना उद्भावित केलेली आहे, ती सर्वथा प्रामादिक आहे. (पहा – श्री ज्ञानदेव – मा. दा, आळतेकर : पृ. ६१-६२.) **दृष्टादृष्टविजयें** – दृष्टादृष्टविजया (पुं.) प्रथमा अ. व. दृष्टादृष्टांविषयी विजयी. हें 'ग्रंथोपजीविये' याचें विधिविशेषण आहे. ग्रंथोपजीवक विजयी व्हावे, असा आशय. 'विजया' म्हणजे 'विजय पावणारा' असा शब्द 'ज्ञानदेवीं'त येतो. पहा – १८·१३८, ११·४७६. वस्तुतः, येथे '°विजयी' असा मूळ शब्द मानिल्यास '°विजयिये' असें रूप व्हावयास हवें. परंतु दोन य्-च्या सांनिध्यामुळे उपांत्य यि-चा लोप झालेला दिसतो. '°विजया' असा मूळ शब्द मानिल्यास या खुलाशाची अर्थातच आवश्यकता नाही. **होआवें** – √हो विध्यर्थ तृ. पु. अ. व. व्हावेत. अनुस्वार अकिंचित्कर.

१७८०.

एथ – या स्थळीं, या संदर्भात. **विश्वेसरु** – (< विश्व + ईश्वर) विश्वेश्वर. १७७२-व्या ओवीमधील 'विश्वात्मक देव'. 'ईसरु' आणि पुढील 'राऊ' हीं पदें अर्थतः पुनरुक्त वाटल्यास 'राऊ' (< √राज्) याचा 'दिव्य' असा अर्थ करितां येईल. **दाऊ** – (< दत्त) दिलेला. 'हा प्रसाद दिलेला (असा) होईल, 'म्हणजे दिला जाईल.' कांही प्रतींत 'दान' (सा, भि, कुं, दां, मा-टीप) असा पाठ आहे, तर कुं (टीप), मा या प्रतींत 'दाय' असा पाठ आहे. **पसाऊ** – (< प्रसाद) अनुग्रह. **सुखिया** – सुखी. हें 'ज्ञानदेऊ' याचें विधिविशेषण. येथे लक्षणीय हें की, हें पसायदान ज्ञानदेवांनी निवृत्तिनाथांपाशी मागितलें नसून 'विश्वात्मक देवा'पाशी अथवा 'विश्वेसरु रावो'पाशी मागितलें आहे. उपक्रम-उपसंहारांवरून हें स्पष्ट आहे.

ओवी सूची

आणि ग्रंथोपजीविये	१७७९
आतां विश्वात्मकें देवें	१७७२
एथ ह्मणे विश्वेसरु राउ	१७८०
किंबहुना सर्वसुखीं	१७७८
चलां कल्पतरूचे आरव	१७७६
चंद्रमे जे आलंछन	१७७७
जें खलांची वांकुडे मोडे	१७७३
दुरिताचें तिमिर जाउ	१७७४
वर्षतें सर्वमंगळीं	१७७५

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32802 वि: निबंध
क्रमांक 9388 नों दि: 23-3-82

शब्दकोश

अखंडित (वि.) – सतत, नित्य.
अनव्रत (वि.) – सतत, सदैव.
अर्णव (पुं.) – समुद्र.
आणि (अ.) – आणि, व.
आतां – यानंतर, यापुढे.
आदिपुरुष (पुं.) – आदिपुरुष, ईश्वर. परमात्मा.
आरव (पुं.) – उद्यान, बाग.
आलंछन (वि.) – कलंकहीन.
इश्वरनिष्ठ (वि.) – ईश्वरावर ज्याची निष्ठा – श्रद्धा आहे असा.
एथ (अ.) – येथे, या स्थलीं.
कल्पतरु (पुं.) – वांछित पदार्थ देणारा स्वर्गीय कल्पित वृक्ष.
किंबहुना (अ.) – फार काय.
खल (पुं.) – दुर्जन.
गावं (पुं.) – ग्राम, गांव.
ग्रंथोपजीवी (पुं.) – ग्रंथावर ज्याचें जीवन आहे असा.
चल (वि.) – चालता.
चंद्रमा (पुं.) – चंद्र.
चिंतामणि (पुं.) – वांछित पदार्थ देणारें स्वर्गीय कल्पित रत्न.
चेतव (वि.) – चैतन्यदायक, प्राणशक्तिप्रद.
ज (सर्वनाम) (वि.) – जो, जी, जें.
√जा (अकर्मक) – होणें.
√जा (अकर्मक) – नष्ट होणें.
जी (अ.) – संबोधनवाचक अव्यय, अहो.
जीव (पुं.) – जीवात्मा, प्राण, अंतःकरण, जीवभाव.
त (सर्वनाम) (वि.) – तो, ती, तें.
तपहीन (वि.) – उष्णतारहित.
तिमिर (नपुं.) – अंधकार.
तीन – तिहिं (संख्याविशेषण) –तिन्ही.
√तोष (ख) (अकर्मक) – संतुष्ट होणें.
दाअ (वि.) – दिलेला.
दान (नपुं.) – दान, देणें.
दुरित (नपुं.) – पाप.
दृष्टादृष्टविजया (पुं.) – दृष्टादृष्ट पदार्थांविषयी विजयी.
√दे (सकर्मक) – देणें, दान करणें.
देव (पुं.) – देव, ईश्वर.
ज्ञानदेव (पुं.) – ज्ञानदेव, ज्ञानेश्वर.
√पड (अकर्मक) – जडणें, जुळणें.
परस्परें (विभक्तिप्रतिरूपक अव्यय) – एकमेकांशीं.
पसाअ(य) (पुं.) – अनुग्रह, प्रसाद.
पां (अ.) – पादपूरक अव्यय.
√पाह (सकर्मक) – प्रकाशित करणें.
पीयूख (नपुं.) – अमृत.
पूर्ण (वि.) – परिपूर्ण.
प्राणिजात (नपुं.) – प्राण्यांचा समूह, प्राणिमात्र.
बोलत (वि.) – बोलका, बोलणारा.
√भज (सकर्मक) – भक्ति करणें.
भूत (नपुं.) – प्राणी, जीव.
भूतल (नपुं.) – पृथ्वीतल, भूमंडल.

√भेट (अकर्मक) – भेटणें.
मांदियळें (नपुं.) – समूह, मेळावा.
मार्त्तंड (पुं.) – सूर्य.
मी (सर्वनाम) – मी (प्रथमपुरुष-वाचक लिंगनिरपेक्ष सर्वनाम).
मैत्र (नपुं.) – मैत्री.
√मोड (सकर्मक) – मोडणें, नष्ट करणें.
रति (स्त्री.) – प्रेम, प्रीति.
राअ (पुं.) – राजा.
√लाह (सकर्मक) – मिळविणें.
लोक (पुं.) – भुवन.
वचन (नपुं.) – बोलणें, उद्गार.
√वर्ष (सकर्मक) – बरसात करणें, वर्षाव करणें.
वांकुडें (स्त्री.) – कुटिलता, वाकडेपणा.
वाग्यज्ञ (पुं.) – वाग्रूप यज्ञ, वाङ्मयरूप यज्ञ.
√वांछ (सकर्मक) – इच्छा करणें.
√वाढ (अकर्मक) – वाढणें.
विशेषें (क्रियाविशेषण) – विशेषतः.
विश्व (नपुं.) – विश्व, जग.
विश्वात्मक (वि.) – विश्व हा ज्याचा आत्मा आहे असा; विश्वाचा आत्मा असलेला.
विश्वेसर (पुं) – विश्वाचा ईश्वर.
सज्जन (पुं.) – सुजन, संत.
सत्संग (पुं.) – संतसंग, सज्जनांचा सहवास.
सदा (अ.) – नित्य, नेहमी.
सर्व (वि.) – सर्व, सगळे.
सर्वमंगल (नपुं.) – सर्व मंगलदायक गोष्टी.
सुख (नपुं.) – सुख, सौख्य.
सुखिय (वि.) – सुखी.
सूर्य (पुं.) – सूर्य, सविता.
सोयर (वि.) (पुं.) – सहोदर, ज्ञातिबांधव, आप्तस्वकीय, इष्टजन.
स्वधर्म (पुं.) – स्वधर्म.
स्वधर्मसूर्य (पुं.) – स्वधर्मरूप सूर्य.
ह (सर्वनाम) (वि.) – हा, ही, हें.
हीं (अव्यय) – समावेशसूचक अव्यय.
√हो (अकर्मक) – होणें.
√ह्मण (सकर्मक) – म्हणणें.

११८८३
REFBK-0011493
मराठी ग्रंथ संग्रहालय ... निर्देश
अनुक्रम ३२८८३ वि.
क्रमांक ९३८८ नों. दि. १३।३।६२